PUNE RESEARCH SCHOLAR ISSN 2455-314X
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY JOURNAL VOL 3, ISSUE 3

# सामाजिक, आर्थिक, राजकीय, मानवाधिकार संबंधी डॉ. आंबेडकर यांचे विचार

प्रा. व्ही. एम. घुबले
B.Com, M.S.W., M.Phil.
सहाय्यक प्राध्यापक
मातोश्री मुंदाफळे समाजकार्य महा.
नरखेड, जि. नागपूर
**महाराष्ट्र भारत**

## सामाजिक विचार

देशात सामाजिक लोकशाही असल्याशिवाय राजकीय लोकशाहीला महत्वउ राहणार नाही हे आंबेडकरांचे स्पष्ट मते होते. आपल्या भारत देशात चार्तुवर्ण्य व्यवस्था होती. या व्यवस्थेनुसार ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य व शुद्र असे समाजाची विभागणी करण्यात आली होती. समाजातील पूजा अर्चादि ब्रम्हमकर्म ब्राहमण वर्गकरीत क्षत्रियांना देशाचे रक्षण करावे लागायचे. वैश्यांना शेती, व्यापार सांभाळावा लागायचा व या तिन्ही वर्गाची सेवा करण्याचे समाजात स्वच्छता ठेवण्याचे कार्य शुद्र वर्गाला करावे लागायचे. ऋग्वेदात एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते की, अर्थ वंशाच्या कोणत्याही व्यक्तीला, त्याच्या आवडीचा आणि लायकीचा व्यवसाय निवडण्याची मुभा होती. परंतु उकालांतराने समाजातील काही मतलबी लोकांनी आपला स्वार्थ साधण्याकरीता ह्या शुद्र लोकांना त्रास दिला. अस्पृश्य म्हणून त्यांना हिणवले. त्यांना मंदिर प्रवेशबंद केला. विहीरा व पाणवठे बंद केले. या करिता अस्पृश्यांना संघर्ष करावा लागला.

सावरकर, गांधीजी नि आंबेडकर या तीन महापुरूषांच्या अस्पृश्यता निवारण चळवळीची तोंडे मात्र एकाच दिशेकडे नव्हती. चातुर्वर्ण्य स्थिर ठेवून अस्पृश्यांना पंचमवर्ण

म्हणून समाजात स्थान द्यावे. अशी गांधीजींची मतप्रणाली होती. त्यांचा कल स्पृश्य हिंदूच्या अंतकरणातील सद्भावना नि भूतदया जागी करण्याकडे होता. मानवतेच्या दृष्टिकोनातून ते जरी ह्या प्रश्नाकडे पाहत असले तरी अस्पृश्यतेच्या प्रश्नाकडे ते सामाजिक दृष्टिकोनातून पाहत नव्हते. आपल्या सामाजिक समतेच्या धोरणाने नि क्रांतिकारक बुद्धिवादाने सावरकरांनी महाराष्ट्र जागा केला होता. अस्पृश्यांना ते धीर देत होते. तरीही सामाजिक दृष्टया मानवतेचा स्पर्श त्यांच्या चळवळीला झालेला नव्हता. आंबेडकरांची भूमिका गांधीजी आणि सावरकर यांच्या भूमिकांपासून मुळातच वेगळी होती ते स्वतः अस्पृश्य समाजात जन्मास आले होते. शस्त्र, विद्या, वित्त यांत होरपळणाऱ्या अस्पृश्यांची दुःखे त्यांनी स्वतः भोगली होती. आंबेडकर म्हणत. 'गुलामाला त्याच्याप गुलामगिरीची जाणीव करून द्या म्हणजेच तो आपोआपच बंड करील म्हणून आत्मोद्धारासाठी झगडत राहा. असा तेजस्वी संदेश देत. देशातील सहा कोटी लोकांना माणुसकीचे हक्क मिळवून देण्याचा त्यांनी प्रयत्न केला. बहिष्कृत हितकारिणी सभेने 1925 च्या जानेवारी महिन्यात सोलापूर येथे पहिले वसतीगृह सुरू केले. त्याकरीता त्यांनी कळकळीने आणि कष्टपूर्वक काम केले. रात्रीच्या शाळा, वाचनालये महारांचा हॉकी क्लब यासारखी क्रीडामंडळे स्थापन केली.

त्रावणकोर संस्थांनातील वायकोम या गावातील ज्या रस्त्यावर ब्राम्हणांची घरे होती तो रस्ता अस्पृश्यांना खुला व्हावा म्हणून सत्याग्रह झाला. स्पृश्यांना सद्बुद्धी सुचली व तो रस्ता खुला झाला. मद्रास येथील मंदिरात मुर्गेसन नावाच्या अस्पृश्यांने प्रवेश केला. पुढे मंदिर प्रवेशपायी त्याला शासनाही झाले. अशा सर्व उताविळया लोकांनी लोकांना बाबासाहेबांनी समजावले समाज परिवर्तन सनदशीर मार्गाने झाले तरच लोकशाही टिकेल असेही सांगितले. त्याकरीता स्वातंत्र्य, समता, बंधुत्व या तत्वांची एकत्र जोपासना करण्यास ते सांगतात. जाती देशविघातक व बंधुत्वाला मारक आहेत. असेही त्यांनी सांगितले वॉल्टर बॅग हॉटची ''चर्चेद्वारे राज्यकारभार'' (गव्टर्मेन्ट बाय डिस्कशन) व अब्राहम लिकनने

सुचविलेली लोकांचे, लोकांसाठी, लोकांकडून चालविले जाणारे राज्य'' ह्या व्याख्यांची आठवण करून ते स्वतःची वगळी वयाख्या वरून लोकशाही समजवून सांगतात ते म्हणतात, ''रक्तपाताचा अवलंब न करता जनतेच्या आर्थिक व सामाजिक जीवनात क्रांतिकरी बदल घडवून आणणारी राज्यपद्धती''.

महाड येथील चवदार तळयाचे पाणी घेण्यावरून स्पृश्य व अस्पृश्य यांच्यात संघर्ष झाला होता. आंबेडकर चवदार तळयांच्या पायऱ्या उतरून खाली गेले व त्यांनी एक ओंजळभर पाणी प्राशन केले. माणूसकीचा अन् समानतेचा संदेश भारताला देणारा तो सोन्याचा दिन 20 मार्च 1927 हा होय. आंबेडकरांच्या जीवनातील परम भाग्याचा तो दिवस 20 मार्च 1927 हा इतिहास 'पाण्याचा दिवस' म्हणून ओळखला जातो. आपल्या संविधानाच्या 15 मध्ये पाण्याचा हक्क लाभलेला आहे. मार्च 1930 मध्ये काळाराम मंदिरात दलितांना प्रवेश देण्यासाठी ऐतिहासिक सत्याग्रह केला. त्यात प्रथमच स्त्रिया सहभागी झाल्या होत्या. 1936 मध्ये त्रावणकोर राज्यात हरिजनांना मंदिर प्रवेशाचा अधिकार देणारा कायदा झाला. भारतातील एखाद्या प्रान्तात असा कायदा प्रथमच होत होता. संविधानाच्या कलम 17 नुसार अस्पृश्यता आपण पूर्ण संपविली आहे.

**खोती वतन पद्धती –**

खोतांनी कुळांची स्थिती सुधारण्याकरिता कसलेही प्रयत्न केले नाहीत म्हणून 1 जानेवारी 1938 रोजी दापोली येथे खोती वतन नष्ट करा ही उमागणी करण्यासाठी परिषद भरली होती. त्या परिषदेस बाबासाहेबांना उपस्थित राहता आले नाही. तरी त्यांचे सहकारी उपस्थित होत. 10 जानेवारी 1938 रोजी मुंबईत स्वतंत्र मजूर पक्षाने वीस हजार शेतकऱ्यांचा मोर्चा आझाद मैदानावरून कौन्सिल हॉलकडे नेला. मोर्चाच्या वतीने बाबासाहेबांनी कॉंग्रेस

मंत्रिमंडळाला शेतकऱ्यांच्या चार मूलभूत मागण्या आणि तेरा तातडीच्या मागण्या सादर केल्या.

वतन पद्धतीने महारांचे जिणे पराधीन झाले होते. त्यांच्यातील स्वाभिमान नष्ट झाला होता. तो जागृत करण्यासाठी कोल्हापूर संस्थानापुरते राजर्षी शाहू महाराजांनी प्रयत्न केलेत. ते बाबासाहेबांनाही पटले. अस्पृश्यांच्या सुधारणेच्या धोरणाची उत्क्रांती होत असतांना मानवी जीवनातील सगळयाच गोष्टी जातिव्यवस्था व अस्पृश्यतेशी जोडल्या गेल्या. 1919 ते 1947 मध्ये दलितांना सामाजिक न्याय मिळवून देण्यासाठी आंबेडकरांनी अनेक उपाय सूचविलेत. भारतीय संविधानात 1950 मध्ये जे धोरण तयार केले गेले ते आंबेडकरांच्या सूचनांचा विचार करूनच शक्ती, युवा, भक्ती, प्रकृती यांचे समाजात ऐक्य असणे अत्यावश्यक आहे. हे आंबेडकरांचे तत्वज्ञान समाजमनाच्या गाभाऱ्यातून साकार झालेले होते. धर्माच्या आणि परंपरेच्या नावाखाली ज्या टाका जनसमुदायाला माणुसकीला पारखे करण्यात आले होते त्यांचा स्वाभिमान चेतवून बाबासाहेबांनी त्यांना समान मानवी हक्काची चळवळीत आणले होते. त्यांच्या आवाहनाला आशयाची व दुःखाची आवर्तने घ्वनित करण्याची लय होती.

**आर्थिक –विचार**

14 एप्रिल 1891 ला जन्मलेल्या डॉ. बाबासाहेबांची दारिद्रयाशी बालपनापासून मैत्री होती. बेरिस्टर झाल्यावरही जवळपास तीन वर्ष ते चटणी भाकरी खात होते. तशीच गरिबाची परिस्थिती होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांना राजकीय, सामाजिक व आर्थिक क्षेत्रात आरक्षण मिळवून देण्याकरीता प्रयत्न केले. आर्थिक प्रश्नात अनेक प्रश्नांची मूळ रोवली गेलेली आहेत. पैश्याने बऱ्याच गोष्टी आपण विकत घेऊ शकतो. तरीही पैस हे जीवनसर्वस्व नाही.

1930 साली भारतीय लष्करात अस्पृश्यांना प्रवेश मिळावा म्हणून भारताचे नवे सरसेनापती म्हणून येणारे (Commanderin –Chief) सर फिलिप चेटवूड यांची भेट घेऊन त्यांच्याशी बोलणी केली. नोकरी, धंद्याच्या बाबतीत लायकीनुसार जागा मिळवण्याची व्यवस्था व्हावी म्हणून त्यांनी कायदा व न्याय मार्गाचा उपयोग केला. कायद्यानुसार दलितांना आरक्षण मिळावे म्हणून आंबेडकरांनी प्रयत्न केलेत. आरक्षणाच्या बाबतीत समाजात सक्रीयता आणण्याचे कार्य मंडल आयोगाने केले. आंबेडकरांना श्रमविभाजावर आधारीत जातीव्यवस्था अपेक्षित होती.

भारतीय राज्यघटनेचा मसुदा तयार करतांना बाबासाहेब एक अर्थतज्ञ होते हे लक्षात आले. घटनेच्या माध्यमातून आर्थिक, सामाजिक लोकशाही स्थापन झाल्या शिवाय राजकीय लोकशाही टिकू शकणार नाही. हे आंबेडकरांनी वेळोवेळी सांगितले. गरिबी, बेकारी, हे कलंक आहेत ते दूर करणे आपले पहिले कर्तव्य आहे. लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. आपण लोकसंख्या नियंत्रणात आणणे गरजेचे आहे. शेती, उद्योगधंदे यांचे राष्ट्रीयीकरण व्हावयास पाहिजे. 1923 मध्ये आर्थिक विचारांवरील डॉ. आंबेडकरांचा ग्रंथ प्रकाशित झाला. या ग्रंथात भारतीय रूपयाचा अनेक अंगांनी त्यांनी अभ्यास केला. इंग्लंड व भारतातील पगारदरांचे उत्पन्न व वस्तुंचे भाव यांचा आलेख देऊन त्यांनी त्यावेळी दाखवून दिले की, इंग्लंडमध्ये पगार जास्त तर भाव कमी व भारतात पगार कमी व भाव जास्त यामुळे रूपयाची क्रम शक्ती घटत चालली आहे. सार्वजनिक आय–व्यय संबंधीचे विचार त्यांनी एम. एस.सी. (अर्थशास्त्र) लिहीलेल्या प्रबंधात मांडले आहे. भारतीय कामगार, शेतकरी व शेतमजूरबद्दलचे बाबासाहेबांचे प्रेम होते ते त्यांनी 1948 च्या किमान वेतन कायद्यातील तरतुदीचा फायदा मिळवून देतांना दिसून येते. हिंदू स्त्रियांची आर्थिक स्थिती हलाखीची होदती. ती स्थिती सुधारण्याकरीता त्यांनी हिंदू कोडबील तयार करून घेतले. यानुसार स्त्रीधनावर स्त्रिला मिळालेल्या पैश्यांवर, दागिन्यांवर तिचाच हक्क राहतो. सासरच्या संपत्तीत

पतीनिधनता नंतरही तिला हक्काशी संमती मिळू शकते. तसेच माहेरच्या संपत्तीत मुलांच्या बरोबरीने मुलीचाही हिस्सा पडतो. हिंदू कोड बीलामुळे स्त्रियांना संरक्षण लाभले.

18 मार्च 1955 रोजी केलेल्या एका भाषाणात आपल्या जीवितांचे ध्येय 1) शिक्षणाचा प्रसार 2) सरकारी नोकरीत दलितांना जास्त नोकऱ्या मिळवून देणे 3) ग्रामीण भागातील अस्पृश्य बांधवांची स्थिती सुधारणे हे होय असे ते म्हणालेत.

आग्रा येथे रविवार दि. 18 मार्च 1856 रोजी डॉक्टरांचे भाषण आयोजित केले होते त्यावेळी डॉ. आंबेडकर म्हणाले ''भाकरीपेक्षा स्वाभिमानाला अधिक महत्व आहे.''

**राजकीय विचार**

सामाजिक व आर्थिक क्षेत्रात जोवर लोकशाही येत नाही तोवर राजकीय क्षेत्रातही लोकशाही टिकु शकणार नाही असे आंबेडकरांचे स्पष्ट मत होते. लोकांचे रासज्य असण्यापेक्षा लोकांच्या कल्याणाकरीता राज्य स्वातंत्र्य, समता, बंधुत्व या तत्वत्रयीचा त्यांनी पुरस्कर केलेला होता. आपले विचार समाजासमोर मांडतांना आंबेडकरांनी स्पष्टपणे अनतेला सांगितले होते कुठल्याही किमतीत व्यक्ती स्वातंत्र्याचा बळी देऊ नका. 1928 साली राजकीय क्षितीजावर त्यांचा उदय झाला. आपल्या आध्यात्मिक व ऐतिहासीक मूर्तिपूजेपेक्षा माणूसकीचे मुल्य त्यांना अधिक वाटायचे. सरकारी कचेऱ्यातून वरिष्टपदी लायक अशा अस्पृश्यांची नेमणूक व्हावी अशी डॉ. आंबेडकरांची सरकारपुढे मागणी होती. याची फलश्रुती म्हणजे जाधवांची बढती ह्याबाबतीत त्या काळचे मुंबईचे राज्यपाल सर लेस्ली विल्सन ह्यांच्याशी आंबेडकराची आंबेडकराची एकदा खडाजंगी झाली होती. विधिमंडळात जे आपल्या बुद्धीला पटले ते आपण बोलतो असे त्यांनी उत्तर दिले.

विधिमंडळात काम करीत असतांना आंबेडकरांनी तेथे गरीब वर्गाची उन्नती साधण्याची आलेली एकही संधी वाया जाऊ दिली नाही. उदा. स्त्री कामगारांचे हित स्त्री

कामगारांना प्रसुतिकाळात सवलती देण्यासंबंधी विधेयक विधिमंडळात मांडण्यात आले होते. त्यावेळी प्रत्येंक मातेला प्रसूतिपूर्व उकाळात आणि प्रसूतिनंतरच्या काळात काही ठराविक काळपर्यंत विश्रांती मिळणे हे राष्ट्रांच्या दृष्टीने हिताचे आहे असे मी मानतो'' असे ते आपल्या भाषणात म्हणाले होते.

1874 सालच्या महार सामाजाच्या सुधारणा कायद्यात सुधारणा करण्याकरीता 19 मार्च 1928 साली विधिमंडळाच्या समोर विधेयक ठेवले. 23 ऑक्टोंबर 1928 या दिवशी सायमन मंडळ, केंद्रीय समिती आणि मुंबई प्रांतिक समिती यांनी पुणे येथे आंबेडकरांची साक्ष घेतली. दलित वर्गीयांबद्दल अनेक प्रश्न विचारले. अखेर अस्पृश्य समाजाला नागरिक हक्क मिळवून देण्यात आंबेडकर यशस्वी झाले. 16 फेब्रुवारी 1946 ला मुंबई विधी मंडळाच्या निवडणुकी संबंधी आज अस्पृश्य वर्गाचे कर्तव्य कोणे हे सांगतांना म्हणालेत, ''निवडणूक जिंकुण राजकीय सत्तेच्या योग्य त्या मान्याच्या जागा काबीज करा'' मरण्याच्या तयारीनेच आम्ही संविधानातुनच उतरलो आहोत असे 1 मार्चला ते म्हणाले.

## भारतीय संविधानात खालील तरतूद केलेली आहे

Article – 330 – Reservation of seats for scheduled casts and scheduled tribes in the House of the People (Loksabha) Article 332- Reservation of seats for scheduled castes and scheduled Tribes in the legislative Assemblies of opportunity in matters of public employment.

भारतीय संविधानानुसार Article 334 नुसार विधान सभेतही राखीव जागा ठेवण्यात आल्या. दलितांना राजकीय क्षेत्रात संरक्षणाची गरज आहे असे त्यांना वाटले त्यांनी हा प्रपंच केला.

आंबेडकरांनी केलेल्या भिन्न मतपत्रिकेमुळे एक थोर राजकीय विचारवंत म्हणून ते मान्यता पावले.

महात्मा गांधीनी येरवडा तुरूंगात प्राणतिक उपोषण झाल्यावर पं. मदनमोहन मालविय प्रभुतींच्या मध्यस्थीने गांधी–आंबेडकर चर्चा झाली. शेवटी पुणे करार जन्माला आला. या करारान्वये दलितांसाठी राखीव जागा मान्य करण्यात आल्या. मात्र त्यासाठी निवडणुक मात्र संयुक्त मतदार संघातुन होईल असे ठरविण्यात आले. संस्थाने वगळून उरलेल्या भारतातील एकुण जागांच्या 18 टक्के जागा दलितांकरीता राखीव ठेवण्यात याव्या असे मान्य करण्यात आले.

घटना समितीच्या सदस्यांकडून टिपणी मागवण्यात आली होती. डॉ. आंबेडकराचे टिपण विस्तृत होते. त्यात थोडया वेगळया सूचना होत्या. त्यात सर्व नागरिकांच्या सैन्यात व नागरीसेवेत प्रवेशाच्या हक्क, सर्व महत्वाच्या उद्योगांचे व शेतीचे राष्ट्रीयीकरण करण्याची मागणी होती ग्रामपातळीवरील पंचायतीवर आधारलेल्या राज्यव्यवस्थेच्या विरोधात होते. संविधानाच्या प्राथमिक मसुद्यात खेडे हा घटक न धरता व्यक्ती हा प्राथमिक घटक मानला गेला त्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्ती केला.

राजकीय सत्ता हीच समाजाच्या प्रगतीची किल्ली आहे म्हणून दलित समाजाचे आपली संघटना करावी ते करीत असतांना कॉंग्रेस आणि समाजवादी पक्षांमध्ये सत्तेचा समतोल साधावा तर त्यांचे कल्याण होईल. भारतीय राज्यघटनेच्या 1192 च्या नियमानुसार (73 वे पोटकलम) खेडयातील पंचायती पासून जिल्हा परिषदेच्या स्तरावर कमजोर वर्गासाठी लोकसंख्येच्या प्रमाणात जागा राखीव ठेवाव्या लागतात.

अस्पृश्योद्धाराच्या कामाकरीता कॉंग्रेसने आतापर्यंत पंचावीस लाख रूपये खर्च केले आहेत असे गांधीजी म्हणालेत तेव्हा आंबेडकर म्हणाले हे पैसे पाण्यात गेले. ''कोणाही

महात्म्यावर आम्ही विश्वासू ठेवू शकत नाही. महात्मे म्हणजे चंचल आभास ते धूळ उडवतात. पण समाजाची पातळी उंचावू शकत नाहीत. (Mahatams like fleeting phantoms, dust , but raise no level.) गांधीजींच्या तोंडावर उभ्या आयुष्यात असे कोणी बोलले नसेल आंबेडकरांचे ते उद्‌गार ऐकून गांधीजी क्षणमात्र सर्दच झाले. ते नरमून म्हणाले ''काही म्हटले तरी तुम्ही थोर देशभक्त आहात!'' त्यावर आंबेडकर आणखीनच चिडले या देशात जी हिनत्वाची वागणूक मिळत होती त्यावर ते नाराज होते. अखेर त्यांनी धर्मांतर करणे स्वीकारले.

**मानवाधिकार, मानवता :**

जातीप्रेम हे लोकशाहीला मारक आहे हे जाणूनच समाजसेवेस बाबासाहेबांनी सुरूवात केली. बाबासाहेब म्हणत की वर्ण आणि जातींच्या उच्च नीचतेच्या कल्पनांना पहिला धक्का गुन्हेगारांच्या जातीची उच्चनीचता न पाहता समान गुन्ह्यांना समान शिक्षा देणाऱ्या इंडियन पीनल कोडने दिला. दुसरा धक्का समता आणि बंधुता यावर आधारलेल्या आणि अस्पृश्यता मानणे हा गुन्हा ठरविणाऱ्या भारतीय राज्यघटनेने दिला. सामाजिक लोकशाही शिवाय राजकीय लोकशाही टिकूच शकत नाही. या लोकशाहीचा अर्थ असा आहे की स्वातंत्र्य, समता व बंधुता ही तत्वे ज्या जीवनात अंतर्भूत झाली आहे ते जीवन, शक्ती, युक्ती, भक्ती, प्रकृती यांचे समाजात ऐक्य असणे अत्यावश्यक आहे. हे आंबेडकरांचे तत्वज्ञान, समाजमनाच्या गाभाऱ्यातून साकार झालेले होते.

डॉ. बाबासाहेब जातीयवादी नव्हते. त्यांच्या राष्ट्र चिंतनाने कबीर, रवीदास, चोखामेळा, दादू आदि संतापेक्षाही महत्वाचे कार्य केले. त्यांच्या चळवळीमध्ये ब्राम्हणही असत. महात्मा गांधी आणि लोकमान्य टिळक या दोघांच्याही तत्वज्ञानाचा चमत्कारीक समन्वय आंबेडकरांच्या राजकारणात बघावयास मिळतो. आंबेडकरांच्या राजकारणाला नैतिक अधिष्ठान होते. राष्ट्राच्या धार्मिक, आर्थिक, सामाजिक क्षेत्रात समता स्थापन झाल्याशिवाय राजकीय

क्षेत्रात समता येणार नाही. हे त्यांचे ठाम मत होते. गांधीजींनी भारताला सत्याग्रह शिकविला, लोकमान्यांना कर्मयोगाचा मार्ग दाखविला, त्याचप्रमाणे समतायोग हा आंबेडकरांच्या महान जीवनाचा संदेश आहे.

धर्मांतराचा विचार वैफल्याच्या भावनेमधून निर्माण झाला अशी अनेक आंबेडकरांवर टीका करतात. पण ही टीका खरी नाही. आंबेडकरांचा पिंड हा धर्मनिष्ठाचा पिंड होता. ते नेहमी म्हणत की, ''माझ्या धर्मांतराच्या मुळाशी आध्यात्मिक भावनेशिवाय दुसरी कसलीही भावना नाही''.

सर्व धर्माचा तौलनिक अभ्यास केल्यांनंतर बुद्धाचा धर्म हा सर्वश्रेष्ठ धर्म आहे अशी त्यांची खात्री झाली. बुद्धाचा धर्म त्यांना खरा मानवी धर्म  वाटला. बुद्धीची नि मानवतेची पूजा करा' अशी त्यांनी देशाला शिकवणूक दिली. ते नेहमी म्हणत, 'ज्या मनुष्याला देवावर विश्वास नाही, धर्मावर विश्वास नाही, त्या मनुष्यावर मी तरी विश्वास ठेवणार नाही''. असे होते डॉ. बाबासाहेबांचे तत्वज्ञान, तीच त्यांची जीवन धारणाही होती.

## संदर्भ ग्रंथ :

1) धर्मांतराचे अर्धशतक – केशव मेश्राम, लोकवाङ्मय गृह 1 ली आवृत्ती

2) डॉ. बाबासाहेब आंबेडकर – धनंजय कीरख पॉप्युलर प्रकाशन तिसरी आवृत्ती

3) दलितांचे बाबा – आचार्य प्र. के. अत्रे परचुरे प्रकाशन, आठवी आवृत्ती

4) भारतीय संविधान आणि शासन पद्धती प्राचार्य गोमकाळे, प्राचार्य पेशवे, प्रा. भेंडे, प्रा. श्रीमती पाटील, संगम प्रकाशन, नागपूर प्रथमावृत्ती

5) अम्बेडकर जीवन दर्शन – डी. आर. निम विद्याविहार, नई दिल्ली – 2 प्रथम संस्करण

6) भाषा दर्पण बी कॉम. भाग 2 नागपूर विद्यापीठ प्रकाशन

7) आधुनिक भारतातील दलित : दृष्टिकोन आणि मुल्ये अनुवाद विद्या भाके

8) मानवी हक्क व समाज – प्रा. नंदकुमार भारंबे, निराली प्रकाशन, पुणे 2009

9) डॉ. आंबेडउकर यांची भाषणे भाग 3 खंड 18 (1949 ते 1956)